**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६१७/२०२५.</u>**
**<u>आदेश नि. ५६ खाली</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने महत्वाची कागदपत्रे दाखल करावयाची असल्याने दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध केला असून त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने दाखल केलेली कागदपत्रे ही पुरावा म्हणून ग्राहय धरता येणार नाही. सदर कागदपत्रे ही पुराव्याच्या कायदयानूसार शाबीत झालेली नाही. सबब वादीचा अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

२. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी दाखल केलेले कागदपत्रामध्ये लाईट बील व फोटोंचा समावेश आहे. वादींनी दाखल केलेले कागदपत्र हे महत्वाचे असल्याने व दाव्याच्या निर्णयाकामी उपयुक्त असल्याने ते अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर कागदपत्र अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जाच्या खर्चाबाबतचा निर्णय अंतिम निर्णयासोबत करण्यात येत आहे. |

KRANTI MAHENDRA PINGALE
Digitally signed by KRANTI MAHENDRA PINGALE
Date: 2026.08.10 17:45:20 +0530

दि.१०/०८/२०२६

(श्रीमती क्रांती म. पिंगळे )
सहदिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अहमदनगर.

**<u>CNR NO. MHAH020027777-2025</u>**